[इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद.]

भारताच्या सर्वोच्च न्यायालयात

दिवाणी अपील अधिकरिता

वि.अ.या. (दि.) क्रं. १२६३५/२०२० मधून उद्धभवलेले

दिवाणी अपील क्र. ३०६२/२०२३

कर्नाटक राज्य व इतर .......अपीलकर्ते

विरुद्ध

श्रीमती भारथी एस. ...... उत्तरवादी

**आदेश**

१. कर्नाटक राज्याने दाखल केलेले हे अपील उमेदवारांच्या अतिरिक्त यादीमध्ये (प्रतीक्षा यादी) उत्तरवादीचे नाव असल्याने, सहाय्यक शिक्षक पदावर उत्तरवादीची नियुक्ती करण्याचे निर्देश देण्याच्या उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाला आक्षेप घेते. नियम आणि सेवांचे नियमन करणारी तत्त्वे विचारात घेतल्यानंतर, आम्ही असे मत व्यक्त करतो की, अतिरिक्त यादी मध्ये नाव दाखल केल्यामुळे नियुक्तीसाठी अधिकार किंवा परस्परसंबंधी दायित्व निर्माण करत नाही. त्यानंतरच्या कारणांसाठी राज्याने दाखल केलेले अपिल मंजूर केले आहे आणि उच्च न्यायालयाचे निर्देश रद्द केले आहेत. अपिल निकालात काढण्यासाठी आवश्यक असणारी तथ्ये पुढील प्रमाणे आहेत :-

२. सार्वजनिक सूचना विभागाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, उत्तरवादीनी चिक्कबल्लापूर जिल्ह्यातील शासकीय प्राथमिक शाळेत सहाय्यक शिक्षक पदासाठी अर्ज केला. निवड प्रक्रियेनंतर, निवड प्राधिकरणाने दिनांक २०.०१.२०१६ रोजी पाच उमेदवारांची अंतिम यादी जाहीर केली. उत्तरवादी त्यापैकी एक नव्हती. तथापि, एक अतिरिक्त यादी (जी प्रतीक्षा यादीच्या स्वरूपात आहे) ती २९.०२.२०१६ रोजी प्रकाशित केली गेली, ज्यात यातील उत्तरवादी या केवळ एका उमेदवाराचा समावेश होता. अतिरिक्त यादीला एक टिप होती, ज्यात असे नमूद केले होते की केवळ यादीमध्ये समावेश केल्याने नियुक्तीचा अधिकार प्रदान होणार नाही आणि अतिरिक्त यादीमध्ये नाव असलेल्या उमेदवारांची निवड तात्पुरती आहे आणि सरकारला वेळोवेळी प्राप्त निर्देशांच्या अधीन आहे.

३. काही महिन्यानंतर म्हणजे २१.०७.२०१६ रोजी, जेव्हा एका निवड झालेल्या उमेदवाराने ती हे पद स्वीकारण्यास इच्छुक असल्याचे निवेदन दिले, तेव्हा उत्तरवादीने ०८.०९.२०१६ रोजी अपीलकर्त्यांना पत्र पाठवले की, अतिरिक्त यादीमध्ये ती एकमेव उमेदवार असल्याने तिच्या उमेदवारीचा विचार करावा.

४. कर्नाटक सरकारच्या दिनांक ११.०४.२००३ च्या कार्यवाहीच्या आधारे राज्याने दिनांक १७.०२.२०१७ रोजी उत्तरवादीची नियुक्तीसाठीची विनंती फेटाळून लावली, ज्यात अशी तरतूद आहे की, अतिरिक्त यादी ती प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून किंवा सर्व पदे भरण्याच्या तारखेपासून सहा महिन्यांपर्यंत वैध राहील, जे अगोदर असेल ते. अतिरिक्त यादी २९.०२.२०१६ रोजी प्रकाशित करण्यात आली असल्याने ती २८.०८.२०१६ पर्यंत वैध असेल. उत्तरवादिनी ०८.०९.२०१६ रोजी निवेदन दिले, जे सहा महिन्याच्या कालावधीच्या पलीकडचे होते आणि म्हणून उत्तरवादिंची विनंती फेटाळण्यात आली. या निर्णयाला उत्तरवादींनी

कर्नाटक प्रशासकीय न्यायाधीकरणा (यापुढे 'न्यायाधिकरण' म्हणून संदर्भित केले आहे) समोर आव्हान दिले होते. न्यायाधिकरणाने ११.०४.२००३ च्या कार्यवाहीवर भिस्त ठेवून अर्ज फेटाळून लावला. या निर्णयाला उत्तरवादीने संविधानाच्या अनुच्छेद २२६ अन्वये रिट याचिकेत कर्नाटक उच्च न्यायालयासमोर आव्हान दिले होते.

५. उच्च न्यायालयाने, यातील आक्षेपित न्यायनिर्णयाद्वारे न्यायाधिकारणाचा आदेश रद्द केला आणि असा निर्णय दिला की, निर्माण झालेले रिक्त पद अस्तित्वात असल्याबद्दलची माहिती उत्तरवादीला देण्यास राज्य सरकार आपल्या कर्तव्यात अपयशी ठरले आहे. तसेच "रिक्त पद भरण्यामध्ये अडथळे होते." या कारणास्तव, उच्च न्यायालयाचे असे मत होते की, उत्तरवादिनी जेव्हा सहा महिन्यांची मुदत संपल्यानंतर अर्ज केला, ही तिची चूक नव्हती. अपीलकर्त्यांना अतिरिक्त यादी आदेशाच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत अंमलात आणण्याचे निर्देश दिले होते.

६. आम्ही पक्षकारांच्या विद्वान वकीलांचे म्हणणे ऐकले. सुरुवातीला, अपीलकर्त्यांनी कर्नाटक सरकारच्या दिनांक ११.०४.२००३ च्या कार्यवाहीवर भरवसा ठेवला आहे जे मूलतः अतिरिक्त यादीच्या मुदती बद्दल स्पष्टीकरण आहे. स्पष्टीकरणाचा संबंधित भाग खालील प्रमाणे आहे. :-

> *"आणि अतिरिक्त यादी किती काळ वैध आहे या प्रश्नासाठी?*
>
> *यासाठी उत्तर आहे की, अतिरिक्त यादी जाहीर झाल्यापासून ६ महिन्यांपर्यंत किंवा आधीच जाहीर झालेली सर्व पदे भरून, जे काही*

*आधी घडेल ते विचारात घ्यावे लागेल."*

७. उपरनिर्दिष्ट स्पष्टीकरणानुसार, अतिरिक्त यादी (प्रतीक्षा यादी) जाहीर केल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या कालावधीसाठी अस्तित्वात राहील. सध्याच्या प्रकरणात, निवड प्रक्रिया जी २३.०३.२०१५ ला सुरू झाली होती २०.०१.२०१६ रोजी निवड यादी निर्गमित करून संपली. त्यानंतर अतिरिक्त यादी दिनांक २९.०२.२०१६ ला अधिसूचित करण्यात आली आहे. जर अतिरिक्त यादीच्या अधिसूचनेच्या दिनांक पासून सहा महिन्याचा कालावधी मोजल्यास ती यादी २८.०८.२०१६ पर्यंत संपुष्टात येईल. उत्तरवादिनी या पदासाठी ०८.०९.२०१६ रोजी अर्ज केल्याचे सांगितले जाते.

८. रिट याचिकाकर्त्याच्या विद्वान वकीलांनी पर्यायी सादर निवेदन केले की, दिनांक ११.४.२००३ रोजीची स्पष्टीकरणात्मक कार्यवाही ज्यावर राज्याने भिस्त ठेवली आहे, ती केवळ कार्यकारी सूचना आहे. असे सादर करण्यात आले की, सेवाप्रवेशाचे नियमन करणारे संबंधित नियम हे कर्नाटक शिक्षण विभाग सेवा (सार्वजनिक सूचना विभाग) नियम, १९६७ आहेत. या नियमांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे आणि सुधारित नियमांचा संबंधित भाग म्हणजे 'प्राथमिक शाळा सहाय्यक संवर्गा' संबंधी नियमांच्या अनुसूचीतील नोंद ६६, ज्यावर भिस्त ठेवण्यात आली आहे, ती खालील प्रमाणे आहे.

> *"उपलब्ध रिक्त जागांपैकी दहा टक्क्यांपेक्षा अधिक नाही आणि मुख्य यादीत समावेश न केलेल्या उमेदवारांची अतिरिक्त यादी निवड प्राधिकरणाने तयार करेल. अशाप्रकारे तयार केलेली यादी शासकीय राजपत्रात प्रकाशित केली जाईल आणि या नियमांतर्गत किंवा प्राथमिक*

*<u>शाळेतील शिक्षकांच्या भरतीसाठी विशेषतः बनविलेल्या इतर कोणत्याही नियमानुसार प्राथमिक शाळा शिक्षकांच्या पुढील भरतीसाठी अधिसूचना प्रकाशित झाल्यापासून प्रवर्तनात असण्याचे बंद होईल.</u>*

*परंतु, ही भरती केवळ अधिसूचित रिक्त पदांच्या प्रमाणात मर्यादित असेल.*

नोंद क्र. ६६ वर भिस्त ठेवून उत्तरवादीच्या वतीने असे सादर करण्यात आले आहे की, प्राथमिक शाळेतील शिक्षकांच्या भरतीकरिता पुढील अधिसूचना निर्गमित होईपर्यंत अतिरिक्त यादी अस्तित्वात राहील.

९. हे खरे आहे की, दिनांक ११/०४/२००३ ची कार्यवाही ही केवळ एक कार्यकारी सूचना आहे आणि सेवांचे नियमन करणाऱ्या नियमांच्या अंमलबजावणीस अधिभावी ठरू शकत नाही. नियम जे सेवांचे नियमन करतात ते सन २००१ मध्ये सुधारित केल्याप्रमाणे कर्नाटक शिक्षण विभाग सेवा (सार्वजनिक सूचना विभाग) (सेवाप्रवेश) नियम, १९६७ हे आहेत. सेवांशी संबंधित असलेल्या नियमाचा म्हणजेच नोंद क्र. ६६ चे बारकाईने वाचन केल्यास हे स्पष्ट होते की, सरकारवर नेमणुका करण्याचे कोणतेही बंधन नाही. केवळ अतिरिक्त यादी प्रसिद्ध केल्याने नेमणूक करण्याचा कोणताही अधिकार निर्माण करत नाही. नियमामध्ये असा कोणताही आदेश नाही. नियमांच्या नोंद क्र. ६६ मध्ये केवळ अशी तरतूद आहे की, निवड प्राधिकरण हे रिक्त पदांच्या दहा टक्क्यांपेक्षा जास्त नाही, अशा उमेदवारांची अतिरिक्त तयार करेल आणि प्रसिद्ध करेल आणि सदर यादी ही पुढील भरतीसाठी अधिसूचना प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून प्रवर्तनात असण्याचे बंद होईल.

१०. कायद्याची भूमिकाही स्पष्ट आहे. सुभा बी. नायर आणि इतर वि. स्टेट ऑफ केरला

आणि इतर[1] मध्ये, ज्यावर सरकारने देखील भिस्त ठेवली आहे, त्यामध्ये असा निर्णय दिला गेला आहे की,

> *"८. सध्याची रिक्त पदे भरायची की नाही, याचा निर्णय हा नियोक्त्याच्या अधिक्षेत्रातील असतो. या मर्यादित कारणावर, भेदभाव किंवा मनमानीपणाचा अभाव असतांना, रिट न्यायालयांनी सहसा अशा प्रकरणांमध्ये हस्तक्षेप करू नये.*
>
> ***९.** के. थुलासीधरन वि. केरला स्टेट पब्लिक सर्व्हिस कमिशन (२००७) ६ एससीसी १९० या प्रकरणातही या न्यायालयाने असेच मत व्यक्त केले आहे.*
>
> ***१९.** वरील परिस्थितीत, ७ रिक्त पदे होती की १६ रिक्त पदे होती या प्रश्नाचे सर्व महत्व कमी होते. आम्ही असे गृहित धरू की, मागणीप्रमाणे, अधिक ९ रिक्त पदे भरली जाऊ शकतात, परंतु, हे साचेबद्ध आहे की, केवळ एखाद्या व्यक्तीचे नाव निवड यादीत आढळले म्हणून नियोक्त्याने विद्यमान रिक्त जागा न भरण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला तर ते स्वतःच एक कारण होऊ शकते, ज्यामुळे बँकेला पद भरण्यासाठी भाग पाडले जाऊ शकते."*

पुढे, शंकरन दास वि. युनियन ऑफ इंडिया[2] या प्रकरणात या न्यायालयाने असा निर्णय दिला की,

> "७. *नियुक्तीसाठी अधिक रिक्त पदे अधिसूचित केल्यास आणि*

---
1 (२००८) ७ एससीसी २१०.
2 (१९९१) ३ एससीसी ४७.

*पुरेश्या संख्येने योग्य उमेदवार आढळून आल्यास, यशस्वी उमेदवारांना नियुक्तीचा निर्विवाद अधिकार प्राप्त होतो, जो कायदेशीररित्या नाकारता येत नाही, असे म्हणणे योग्य नाही. सर्वसाधारणपणे, ही अधिसूचना म्हणजे केवळ पात्र उमेदवारांना सेवाप्रवेशासाठी अर्ज करण्याचे निमंत्रण आहे आणि त्यांच्या निवडीवर त्यांना या पदावर कोणताही अधिकार प्राप्त होत नाहीत. जोपर्यंत, संबंधित सेवाप्रवेशाचे नियम असे दर्शवितात की, राज्य सर्व किंवा कोणतीही रिक्त पदे भरण्याच्या कोणत्याही कायदेशीर कर्तव्याच्या अधीन नाही. तथापि, याचा अर्थ असा नाही की, सरकारकडे मनमानी पद्धतीने काम करण्याचा परवाना आहे. रिक्त पदे न भरण्याचा निर्णय हा प्रामाणिकपणे योग्य कारणास्तव घ्यावा लागेल आणि जर रिक्त पदे किंवा त्यापैकी कोणतीही पदे भरली गेली तर, सेवाप्रवेशासाठीच्या परीक्षेत प्रतिबिंबित झालेल्या उमेदवारांच्या तुलनात्मक गुणवत्तेचा आदर करण्यास राज्य बांधील आहे आणि कोणत्याही भेदभावास परवानगी दिली जाऊ शकत नाही. ह्या योग्य स्थितीचे या न्यायालयाद्वारे सातत्याने अनुसरण केले गेले आहे आणि आम्हाला, स्टेट ऑफ हरियाणा वि. सुभाष चंदेर मरवहा, (१९७४) ३ एससीसी २२०; निलीमा रांगला वि. स्टेट ऑफ हरियाणा, (१९८६) ४ एससीसी २६८ किंवा जतींदर कुमार वि. स्टेट ऑफ पंजाब, (१९८५) १ एससीसी १२२, या प्रकरणांतील न्यायनिर्णयांमध्ये कोणतीही विसंवादी नोंद आढळत*

*नाही.”*

११. उपरोक्त न्यायनिर्णयांमधून जी स्थिती समोर येते ती अशी आहे की, अतिरिक्त यादी (प्रतीक्षा यादी) मधील रिक्त पदे भरण्याचे कार्य हे केवळ अनिवार्य नियमाच्या आधारावर उद्भवू शकते. तश्या महादेशाच्या अभावी, अतिरिक्त यादीतील सर्व रिक्त पदे भरण्याचा निर्णय सरकारच्या समंजसपणावर सोडला जातो. तथापि, आम्ही असे म्हणू की, सरकार स्वेच्छेनुसार वागू शकत नाही, त्याची कृती न्यायालयीन पुनरावलोकनाच्या अधीन असेल.

१२. प्रस्तुत प्रकरणातील वस्तुस्थितीकडे परत पहिले तर, १९६७ च्या नियमावलीतील नोंद क्र. ६६ च्या आधारे नेमणूक करण्याचा अधिकार असल्याचे गृहीत धरून उच्च न्यायालयाने चूक केले आहे, असे आमचे मत आहे. आम्ही असे पहिले आहे की, नियम स्वतः कोणताही अधिकार निर्माण करत नाहीत आणि अशा भूमिकेला कायद्याच्या कोणत्याही तत्वाचा पाठिंबाही नाही. शेवटी, नियुक्त उमेदवाराच्या राजीनाम्याबाबत उत्तरवादी अनभिज्ञ असल्याचा उच्च न्यायालयाचा निष्कर्ष हा या नियमाच्या अंमलबजावणीवर कोणताही परिणाम करणार नाही. अतिरिक्त यादीची अंमलबजावणी जी शासन राजपत्रात प्रकाशित केली जाणार आहे ती वैयक्तिक उमेदवारांच्या माहितीनुसार नाही तर नियमात निर्दिष्ट केलेल्या वेळेवर अवलंबून असेल.

१३. शेवटी, आमचे असे मत आहे की, उच्च न्यायालयाने सरकारला अतिरिक्त यादी लागू करण्याचे आणि आदेशाच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत उत्तरवादीची नेमणूक करण्याचे निर्देश देऊन चूक केली आहे. या परिस्थितीत, कर्नाटक राज्याने दाखल केलेले दिवाणी अपील क्र. ३०६२/२०२३ हे मंजूर करण्यात येत आहे आणि उच्च न्यायालयाचा रिट याचिका क्र. ५१९०४/२०१९ यामधील दिनांक ३१/०१/२०२० रोजीचा आदेश हा रद्दबातल

करण्यात येत आहे.

१४. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

............. सरन्यायाधिश

[डॉ. धनंजय वाय. चंद्रचूड]

..............न्या.

[पमिंदीघंतम श्री. नरसिंह]

नवी दिल्ली,

मे १९, २०२३.

**x-x-x-x**

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

**x-x-x-x**